लोकमत

# नाट्यचळवळीत नव्या पिढीचा सहभाग हवाच!

संमेलनामध्ये अनेक व्यावसायिक नाटकं आणि अशोक हांडे यांचा मराठी बाणा हे कार्यक्रम प्रचंड गर्दीत सादर झाले. हे सगळं भव्य दिव्य आणि देखणं होतं, परंतु शेवटी एक प्रश्न पडतो की, या संमेलनाचा स्थानिक कलावंतांना कितपत फायदा होतो?



**श्रीपाद येरमाळकर**
रंगकर्मी

सोलापुरात डिसेंबर अखेर शंभराव्या नाट्य संमेलनांतर्गत मोठे संमेलन पार पडले. तत्पूर्वी पूर्वरंगमध्ये स्थानिक कलावंतांनी आपली सादरीकरणं उत्तम साकारली. संमेलन सुरू झाल्यानंतर नाट्य दिंडी तर अतिशय भव्य व देखणी होती.

सोलापुरातील जवळजवळ ४५ शाळा व महाविद्यालयाने यात वेगवेगळ्या कला सादर करत सहभाग नोंदविला. जवळजवळ दहा हजार विद्यार्थी या नाट्य दिंडीत सहभागी होते.



या संमेलनात अनेक समित्या स्थापित झाल्या. त्यातून अनेक रंगकर्मी आणि शिक्षकांनी आपलं अनमोल योगदान दिलं. संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते सोलापुरातील अनेक ज्येष्ठ कलावंतांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

संमेलन म्हटल्यानंतर त्या ठिकाणी अनेक अडचणी उभ्या राहतात. परंतु या सर्वांवर मात करीत कार्याध्यक्ष प्रकाश यलगुलवार आणि प्रमुख कार्यवाह विजय दादा साळुंके यांनी वाट काढत संमेलन यशस्वी केलं. त्यांना स्वागताध्यक्ष पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. शिवाजीराव सावंत यांनी खंबीर पाठिंबा दिला. सोलापुरातील अनेकांचा या संमेलनास आर्थिक हातभार ही लागला.

संमेलनामध्ये अनेक व्यावसायिक नाटकं आणि अशोक हांडे यांचा मराठी बाणा हे कार्यक्रम प्रचंड गर्दीत सादर झाले. हे सगळं भव्य दिव्य आणि देखणं होतं, परंतु शेवटी एक प्रश्न पडतो की, या संमेलनाचा स्थानिक कलावंतांना कितपत फायदा होतो?. कारण अनेक दिग्गज अभिनेते, अभिनेत्री, दिग्दर्शक, नेपथ्यकार, संगीतकार, आणि रंगभूषाकार या सर्वांचा नाटकं उभी करण्यात मोठा वाटा असतो. तेव्हा या सर्वांची चर्चासत्रे, परिसंवाद आणि मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित झाली असती तर त्याचा फायदा स्थानिक कलावंत आणि तंत्रज्ञांना झाला असता. परंतु या प्रकारचे कार्यक्रम विभागीय संमेलनातसुद्धा असावेत असे एक मत.

संमेलन यशस्वी झालं यात आनंदच आहे; पण एक खंत वाटते की, या संमेलनात तरुण पिढी कार्यकर्ते म्हणून कमी दिसली अनेक समित्यांमधून आणि वेगवेगळ्या व्यवस्थेमध्ये प्रौढ रंगकर्मी होते, म्हणजे तरुण पिढी नाटकांपासून दूर जाते आहे का हा प्रश्न पडतो, याचा विचारही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मुख्य शाखेने आणि महाराष्ट्रातील सर्व शाखांनी करून तरुण पिढीस नाटकाकडे कसे आकर्षित करता येईल, यासाठी काही कार्यक्रम वर्षभर राबवावेत, अन्यथा काही वर्षांत नाटकास प्रेक्षक दुर्लभ होतील. त्याचबरोबर व्यावसायिक लोकांना मानधन देऊन बोलावलं जातं त्यापेक्षा स्थानिक कलावंतांना काही प्रमाणात का होईना मानधन देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवावा. कारण खूप गर्दी जमली म्हणजेच संमेलन यशस्वी होतं असं नव्हे तर संमेलनाचा फायदा तेथील रंगकर्मींना किती झाला यावरून ते यशस्वी झालं हे आपण ठरवू शकतो.